No. [illegible]
Computer Section
Civil Court, Pune.
Date: 11 JUL 2012

Presented on 11 JUL 2012
Superintendant
Civil Court, Sr. Dn., Pune.

नि-9

# पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (सि.डी.) यांचे कोर्टात

स्पे.दि.मु. नं. 686/२०१२

सौ. निर्मला बाळासाहेब कावडे
वय :— ४० वर्षे, व्यवसाय :— काही नाही,
रा. पाटीलनगर, बावधान बु।।, पुणे — २१
तर्फे कुलमुखत्यारधारक
श्री. रामेश्वर आप्पा सुतार
वय :— ३२ वर्षे, व्यवसाय :— व्यापार,
रा. पाटीलनगर, बावधान बु।।, पुणे — २१ ... **वादी**

विरूद्ध

१) श्री. सखाराम भाऊ कावडे
वय — ७५ वर्षे, व्यवसाय :— शेती,
रा. मु.पो. कुसगाव, (कामशेत) ता. मावळ, जि. पुणे

२) श्री. बबन सखाराम कावडे
वय — ५५ वर्षे, व्यवसाय :— शेती,
रा. मु.पो. कुसगाव, (कामशेत) ता. मावळ, जि. पुणे

३) श्री. बाळासाहेब सखाराम कावडे
वय — ४५ वर्षे, व्यवसाय :— शेती,
रा. मु.पो. कुसगाव, (कामशेत) ता. मावळ, जि. पुणे

४) श्री. संतोष सखाराम कावडे
वय — ३८ वर्षे, व्यवसाय :— शेती,
रा. मु.पो. कुसगाव, (कामशेत) ता. मावळ, जि. पुणे

५) सौ. कोंडाबाई सखाराम कावडे
वय — ६५ वर्षे, व्यवसाय :— शेती,
रा. मु.पो. कुसगाव, (कामशेत) ता. मावळ, जि. पुणे ... **प्रतिवादी**

Dft noted that although defendant no. 4 appeared by filing application Ex. 20 & Vakalatnama Ex. 21 he failed to file written statement on record. Hence, suit to proceed further without written statement of defendant no. 4
26.7.13

<u>दावा :— ठराव ताकीद मनाई तसेच ताबा मिळणेसाठी</u>

दाव्याची किंमत - ६,५६,000/-

सदरील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते पुढीलप्रमाणे :—

१)  **अ) मिळकतीचे वर्णन :—** तुकडी पुणे पोट तुकडी तालुका मावळ, जिल्हा पुणे, मे. दुय्यम निबंधक मावळ यांच्या कार्यकक्षेतील तसेच जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती मावळ पैकी ग्रामपंचायत कुसगाव यांच्या हद्दीतील गांव मौजे कुसगाव येथील शेतजमीन मिळकती :—

| अ. क्र | गट क्रमांक | क्षेत्र हे— आर | पोटखराबा क्षेत्र हे—आर | एकुण क्षेत्र हे—आर | आकार रूपये—पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २८ | ००—२४ | ००— ०२ | ००—२६ | ००—५० |
| २ | ६४ पैकी | ००—३७.५ | ००—५.६ | ००—४३.१ | ०३—२६ |
| ३ | ५६३ | ०५—४७.९ | ००—०८ | ०५—५५.९ | १६—८१ पैकी प्रतिवादी यांचे मालकीचे क्षेत्र ०३ हे ७४ आर |
| ४ | ६८० | ००—३६ | ००—२६ | ००—६२ | ००—५० |
| ५ | ४७६ पैकी | ००—१५.३ | — | ००—१५.३ | ०१—०७ |

ब)  सदरचे दावा कलम १ (अ) मधील एकुण क्षेत्र ०५ हेक्टर २० आर असे येत असुन सदरच्या क्षेत्रात प्रतिवादी यांचा १/५ हिस्सा म्हणजेच ०१ हेक्टर ०४ आर हिस्सा येत आहे. प्रतिवादी नं. ३ यांचे हिस्यास येणाऱ्या त्या क्षेत्रात म्हणजेच ०१ हेक्टर ०४ आर मिळकतीला वादींचा अर्धा हिस्सा म्हणजे ०० हेक्टर ५२ आर जमिन मिळकत क्षेत्र येत आहे. सदरील क्षेत्र दाव्याचा मुख्य विषय आहे.

२)  सदरील दाव्यातील प्रतिवादी नं. ३ हे वादीचे पती असुन प्रतिवादी नं. १ हे वादीचे सासरे आहेत. तसेच प्रतिवादी नं. २ व ४ हे वादीचे दीर आहेत. तसेच दाव्यातील प्रतिवादी नं. ५ हया वादीच्या सासु आहेत. सदरच्या दाव्यात वादीने कारणापुरता वंशवेल दिलेला आहे.

**सखाराम भाऊ कावडे**

कोंडाबाई (पत्नी)  बबन (मुलगा)  बाळासाहेब (मुलगा)  संतोष (मुलगा)

निर्मला (पत्नी) वादी

३) सदरील दाव्याचे प्रतिवादी नं. ३ हे वादीचे पती असुन त्यांचा विवाह दिनांक २३/०५/१९९४ रोजी हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झालेला आहे. सदरच्या विवाह संबंधातून वादीला कोणतेही अपत्य झाले नाही. सदर प्रतिवादी नं. ३ हे वादींच्या सख्ख्या आत्यांचा मुलगा आहे. वादी यांचा विवाह झाल्यानंतर त्यांचे सासरी नांदण्यास गेले तेथे त्यांचे सासरे—सासू, दीर, नवरा, नणंद असे एकत्र राहत होते. लग्न झाल्यानंतर थोडे दिवसच प्रतिवादींनी वादींना व्यवस्थित सांभाळले त्यानंतर प्रतिवादी नं. ३ आणि घरातील सर्वजण वादींचा मानसिक व शारिरीक छळ करू लागले. तसेच हुंडयाची मागणी करून वादींना बेदम मारहाण करू लागले. प्रतिवादींनी संगनमत करून वादीला बेदम मारहाण केली व तिला बेशुद्ध अवस्थेत टाकुन दिली. सदरची बाब वादींच्या आईवडिलांना समजल्यावर वादींचे आई—वडिलांनी वादीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून तिच्यावर उपचार चालु केले. प्रतिवादींच्या मारहाणीमुळे वादी अपंग झाल्या आहेत. त्यांना हिंडता फिरता येत नाही. तसेच त्यांनी प्रतिवादींची धास्ती घेतली आहे. वादीने प्रतिवादींचे विरूद्ध भा.द.वि. कलम ४९८अ, ३२३, ३२४, ३४ नुसार तळेगाव पोलीस स्टेशनमध्ये फिर्यादी दिली त्याप्रमाणे पोलीसांनी प्रतिवादींविरूद्ध गुन्हा दाखल करून आरोपींविरूद्ध वडगाव—मावळ येथील कोर्टात चार्जशीट दाखल केले.

४) वादींनी प्रतिवादी नं. ३ यांचेविरूद्ध पुणे येथील कौटुंबिक न्यायालयात १०/०७/१९९९ मध्ये सी.आर.पी.सी. १२५ नुसार पोटगीचा दावा दाखल केला होता. त्या दाव्याचा क्र. १९४/१९९९ असा आहे. सदरच्या पिटीशनमध्ये जाबदेणार यांनी अर्जदाराला दरमहा रूपये १०००/— प्रमाणे पोटगीचा हुकुम दिनांक २८/०२/२००३ रोजी केलेला आहे. सदरचा हुकुम झाल्यावर जाबदेणार देणार म्हणजेच प्रतिवादी नं. ३ यांनी अद्याप वादींना कोणतीही पोटगीची रक्कम दिली नाही किंवा वादीची साधी चौकशीही केली नाही. वादींनी प्रतिवादी नं. ३ यांचे विरूद्ध पोटगी वसुलीसाठी अर्ज केलेला होता. त्याचा क्र. ३९६/२००५ असा होता. परंतु सदरील जाबदेणार दिलेल्या पत्यावरून हेतुपूर्वक पळुन गेल्यामुळे प्रतिवादींकडून अद्याप कोणतीही पोटगी वादींना मिळाली नाही. वादी हया अपंग असुन त्या झोपून आहे. त्यांचा औषधोपचार, खाणे—पिणे यांचा सर्वस्वी खर्च वादीचे आई—वडिल कसेबसे करत आहेत.

५) प्रतिवादी नं. १ यांचे नावे गाव मौजे कुसगाव, ता. मावळ, जि.पुणे येथे वडिलोपार्जित जमिन मिळकती आहेत. त्या जमिनी वडिलोपार्जित असल्यामुळे त्या मिळकतीत प्रतिवादी नं. ३ यांचा समान हिस्सा आहे. सदरच्या सर्व जमिनी दावा मिळकत कलम १ मध्ये उल्लेख केलेल्या आहेत. दिनांक १०/०५/२०१२ रोजी प्रतिवादी यांनी सदरच्या दावा मिळकतीपैकी गट नं. २८ मधील शेतजमिन विक्री संबंधी दैनिक प्रभात वर्तमानपत्रात ॲड. सुभाष रावते यांचेमार्फत जाहिर नोटीस दिली होती. त्या जाहिर नोटीशीस वादींनी ॲड. राजू केशरकर यांचेमार्फत हरकत घेऊन सदरील मिळकतीत वादींचा पोटगीचा हक्क अबाधित आहे असे सांगितले. परंतु

प्रतिवादींनी सदरची हरकत मान्य न करून उर्वरीत मिळकतीसुद्धा विकणेचे दृष्टिकोनातून प्रयत्न चालू केलेले आहेत. सदरच्या दावा मिळकतीत वादींचा हिंदु विमेन्स राईट्स प्रॉपर्टी ॲक्ट १९३७ नुसार हक्क अधिकार प्राप्त होत आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती प्रतिवादींच्या वडिलोपार्जित मालकीच्या असल्याने प्रतिवादी नं. ३ यांचा समान मालकी हक्क व अधिकार आहे. त्या येणाऱ्या हिश्यात वादींचा पत्नी म्हणून समान हक्क व अधिकार प्राप्त होत आहे. परंतु प्रतिवादी हे जाणून बुजून वादींचा हिस्सा डावलण्याच्या दृष्टिकोनातून सदर मिळकती तिऱ्हाईत इसमांस विक्री करत आहेत. प्रतिवादी नं. ३ यांनी आत्तापर्यंत म्हणजेच सन १९९९ ते आत्तापर्यंत वादींना कोणतीही पोटगीची रक्कम दिलेली नाही. तसेच वादींचे औषधोपचार, देखभालीसाठीही कोणतीही रक्कम दिली नसून वादींची साधी चौकशीही केली नाही. उलट प्रतिवादी नं. ३ यांनी दुसरा विवाह केला आहे. प्रतिवादी नं. ३ यांनी वादींना कोणताही रक्कम, पोटगी अदा केली नसल्यामुळे दावा मिळकतीत प्रतिवादी नं. ३ यांचे येणारे जमिन मिळकत हिश्यावर वादींचा पोटगी, चोळीबांगळी हक्क प्रस्थापित होत आहे. सदरचे दावा मिळकतीत प्रतिवादी नं. ३ यांचे येणारे हिश्यात वादींचा समान हिस्सा लागू होत असून प्रतिवादी नं. ३ यांचे हिश्याची जमिन मिळकत विक्री करून वादींना पोटगी नुकसानभरपाई व इतर खर्च वसून करून मिळणेसाठी वादींना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

६) सदरची दावा मिळकत ही प्रतिवादींचे वडिलोपार्जित मालकी हक्काची असून त्यात प्रतिवादी नं. ३ यांचा समान हिस्सा असून त्या हिश्यात समान वाटणी मागण्याचा, तयेच प्रतिवादी नं. ३ यांचा हिस्सा विक्री करून वादींची पोटगी, नुकसान भरपाई खर्च वसूल करण्याचा वादींना हक्क व अधिकार आहे. सदरच्या दावा मिळकती विक्री करू नये व त्या मिळकतीत वादींचा हिस्सा व अधिकार आहे. संबंधी वादींनी त्यांचे वकील ॲड. राजू केशरकर यांचेमार्फत दिनांक २३/०५/२०१२ रोजी दैनिक पुढारी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस दिली आहे व त्यासंबंधी माहिती प्रतिवादींना दिली आहे. परंतु प्रतिवादी जाणूनबुजुन सदर दावा मिळकती विक्री करण्याचे तयारीत आहे. सदरच्या दावा मिळकतींचीप्रतिवादींनी विक्री केल्या तर वादींना सदरच्या मिळकतीतून स्वतःची पोटगी रक्कम वसूल करता येणार नाही. सदरच्या दावा मिळकतीशिवाय वादींना दुसऱ्या मिळकतीतून पोटगी रक्कम वसूल करण्याची शक्यता दिसून येत नाही. तसेच प्रतिवादी नं. ३ यांनी स्वतःचा हिस्सा विक्री केला तर वादींना त्या मिळकतीतून स्वतःचा अर्धा हिस्सा मागण्याचा हक्क अधिकार राहणार नाही. वादी प्रतिवादींच्या मारहाणीमुळे अपंग झालेल्या आहेत. त्या एकाजागी झोपून आहेत. त्याचा दरमहा औषधोपचार, खाणेपिणे इ. खर्च रक्कम रूपये १५,०००/— आहे. तसेच सन १९९९ पासून कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे प्रतिवादी नं. ३ यांनी पोटगी रक्कम प्रतिमाह रूपये १०००/— प्रमाणे एकुण रक्कम रूपये १,५७,०००/— अदा केलेली नाही. उलट प्रतिवादी नं. ३ यांनी दुसरा विवाह करून भा.द.वि. ४९४ प्रमाणे गुन्हा केलेला आहे व वादींचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. सदरच्या दावा मिळकती विक्री करून वादींना पोटगी रक्कम अदा होणार आहे. त्यामुळे वादींना सदरचा दावा

दाखल करणे भाग पडले आहे. सदरील प्रतिवादी हे धूर्त कावेबाज व निष्ठूर आहेत. वादींना कोणतीही रक्कम प्रवितादी देणेस तयार नाहीत. तसेच सदरच्या मिळकतीत असणारा हिस्सा सुद्धा प्रतिवादी देऊ इच्छित नाहीत. सदरच्या दाव्यात प्रतिवादी नं. १, २, ४ व ५ हे दावा मिळकतीत समान हिस्सेदार आहेत. तसेच सदरच्या प्रतिवादींनी सुद्धा वादींचा अतोनात मानसिक छळ केलेला आहे. सदरच्या दावा मिळकतीत सदरील प्रतिवादी सह–हिस्सेदार असल्याने त्यांना सदर दाव्यात समाविष्ट केलेले आहे.

७) दाव्यास कारण :– दिनांक १०/०५/२०१२ रोजी प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतीमधील गट नं. २८ मधील क्षेत्र २६ आर विक्रीस काढले व तशी नोटीस ॲड. सुभाष रायते यांचेमार्फत दैनिक प्रभात या वर्तमानपत्रात दिनांक १०/०५/२०१२ रोजी जाहिर नोटीस दिली, त्या नोटीशीस वादींनी हरकत घेऊन ॲड. सुभाष रायते यांना रजि. पोष्टाने हरकत पाठविली व ती हरकत ॲड. सुभाष रायते यांना मिळाली तेव्हा दाव्यास कारण घडले. तसेच दिनांक २३/०५/२०१२ रोजी वादींनी ॲड. राजू केशरकर यांचे मार्फत दावा मिळकतीत स्वत:चा हक्क असलेसंबंधी तसेच प्रतिवादींनी दावा मिळकती विक्री करू नये व सदर मिळकती कोणी विकत घेऊ नये म्हणून दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात जाहिर नोटीस दिली तेव्हा दाव्यास कारण घडले व रोज घडत आहे.

८) दाव्याची आकारणी :– वादींनी सदरचा दावा ठराव ताकिद तसेच रक्कम वसुली आणि ताब्यासाठी केलेला आहे. वादींनी मागणी केलेले क्षेत्र ०० हेक्टर ५२ आर याची सरकारी किंमत रक्कम रूपये ५,००,०००/– अशी आहे. तसेच वादींनी मागणी केलेले थकीत पोटगी रक्कम रूपये १,५७,०००/– (अक्षरी रक्कम रूपये एक लाख सत्तावन्न हजार फक्त) असे असून मनाईसाठी रूपये २०००/– अशी आहे. म्हणजेच रूपये ५,००,०००/– + रूपये १,५७,०००/– + रूपये २०००/– अशी एकुण रक्कम रूपये ६,५९,०००/– (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख एकोणसाठ हजार फक्त) या किंमतीवर दाव्याची आकारणी केली आहे व त्यावर आवश्यक तो कोर्ट फी स्टॅम्प वादींनी दाव्यासोबत जोडलेला आहे.

९) सदरची दाव्याची आकारणी ही रक्कम रूपये ६,५९,०००/– अशी असल्याने सदरचा दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर कोर्टास चालविण्याचा अध्किार आहे. सबब मे. कोर्टास अधिकार क्षेत्र आहे. सदरच्या कारणासाठी वादींनी प्रतिवादींविरूद्ध अन्य कोणत्याही कोर्टात दावा दाखल केलेला नाही.

१०) तरी मे. कोर्टास नम्र विनंती की,

ए) वादींचा दावा मंजूर करावा.

बी) दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीत वादींचा कायदेशीर हक्क आहे असा ठराव मे. कोर्टाने करावा ही विनंती.

(see order below Ex 49)

In view of order below Ex-49, the plaintiff is permitted to withdraw this suit and file fresh. Hence this suit stands disposed of.

Court fee be refunded, if any, as per rules.

No order as to costs.

[signature]

25-1-16

सी) दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर वादींचा पोटगी हक्क आहे असा ठराव मे. कोर्टाने करावा ही विनंती.

डी) दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत विक्री करून वादींना पोटगी रक्कम रूपये १,५७,०००/— प्रतिवादी नं. ३ यांनी अदा करावी असा हुकुम मे. कोर्टाने करावा ही विनंती.

इ) दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये वादींचे पती (प्रतिवादी नं. ३) यांचा तुटक एक पंचमांश हिस्सा काढून त्या हिश्यामध्ये वादींचा तुटक समान हिस्सा आहे, असा हुकुम करून सदरचा हिस्सा मे. कोर्टाने वादींच्या ताब्यात देणेचा हुकुम करावा.

एफ) दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत वादींचे संमतीशिवाय प्रतिवादींनी विक्री करून नये असा हुकुम मे. कोर्टाने करावा.

जी) दाव्याचा संपूर्ण खर्च प्रतिवादींनी वादींना दयावा असा हुकुम मे. कोर्टाने करावा.

एच) दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रतिवादींनी तिऱ्हाईत इसमांस विक्री केली असेल तर ते खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असा ठराव मे. कोर्टाने करावा.

आय) मे. कोर्टाने वादींचे वतीने आवश्यक ते इतर न्यायाचे हुकुम करावेत.

**स्थळ : पुणे**
**दिनांक :** 11/7/2012

वादी


**वादी तर्फे ॲडव्होकेट**

## व्हेरीफिकेशन

मी, **सौ. निर्मला बाळासाहेब कावडे,** वय :—४० वर्षे, व्यवसाय :— काही नाही, रा. पाटीलनगर, बावधान बु।।, पुणे — २१ **तर्फे कुलमुखत्यारधारक श्री. रामेश्वर आप्पा सुतार** वय :— ३२ वर्षे, व्यवसाय :— व्यापार, रा. पाटीलनगर, बावधान बु।।, पुणे — २१ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, सदरील दाव्यातील संपूर्ण मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेसाठी सदरचे व्हेरीफिकेशनवर पुणे मुक्कामी मी सही केली आहे.

वादी

पुणे
ता. 11/07/2012




२४/०७/१२

सदरप्रकरणी प्रोसेसकामी रक्कम रुपये ५००/- जमा असे

पुणे

ता. १९/०६/२०१२

वादीतर्फे वकील